नियमीत दावा क्र. १३७/२०२४
इज्ञतखान वि. ग्रामसेवक ग्रामपंचायत कोक

**MHPA170011902024**

नि.क्र. १२ वर आदेश

सदरचा अर्ज वादीने दावामिळकतीबाबत जैसे थे आदेश मिळण्याकरीता दिला आहे.

०२. वादीने सदरचा दावा हा कायमच्या मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. त्यामध्ये प्रतिवादी हजर झाले असून त्याच्या म्हणणे करीता दावा प्रलंबित आहे. तसेच दाव्यात तात्पूरता हुकूमाकरीता देखील नि.क्र. ०५ वर वादीने अर्ज दिला आहे. वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, ग्रामपंचायत कोक येथील ग्रामपंचायत घर क्र. १९२ ज्याचा तपशील दाव्याच्या क्लेम कॉजमध्ये दिला आहे. ते वादीचे राहते घर असून दावामिळकत आहे. वादी हा विविध कार्यकारी ग्रुप सोसायटीचे चेअरमन आहे. वादीच्या कामाबदल आकस धरून नदीम शेख व इतर यांनी वादीवर दबाब टाकण्याकरीता ग्रामपंचायत कोक यांच्याकडे दिनांक १०/१०/२०२३ पासून वादमिळकतीतील काही भाग हा सामाईक रस्त्यात अतिक्रमीत असून ते बांधकाम पाडावे या करीता विविध खोटेनाटे अर्ज दिलेले आहेत. या व्यक्तींच्या दबावा खाली प्रतिवादी यांनी दिनांक १४/०६/२०२४ रोजी वादीला लेखी नोटीस दिली आहे व पंधरा दिवसात वादीने बांधकामाचा जो भाग सामाईक जागेवर आलेला आहे तो काढून टाकण्याबाबत सांगितले आहे अन्यथा कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असे कळविले आहे. शेख नदीम व इतर यांनी प्रतिवादी ग्रामपंचायत सदस्य यांना कार्यवाही न केल्यास आमरण उपोषण करण्याची

धमकी दिली. त्या दबावाला बळी पडून राजकीय हेतूने प्रतिवादी वादीविरूध्द गैर कायदेशीर कार्यवाही करू शकतो. त्यामुळे निक्र. ०५ वर सुनावणी होऊन आदेश होईपर्यंत जैसे थे आदेश पारी करण्याकरीता वादीने विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी हा दिनांक २७/०८/२०२४ रोजी हजर झाला असून आजतागायत त्याने म्हणणे दिलेले नाही. सबब, अर्ज त्याच्या म्हणणे विना निकाली काढण्यात येतो.

०४. दाव्याचे आणि कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यातुन असे लक्षात येते की शेख नदीम व इतर हे दाव्यात सामील केलेले नाहीत. शेख नदीम यांनी प्रतिवादीला दिनांक १०/१०/२०२३, १०/११/२०२३ व ०५/०६/२०२४ रोजी अर्ज दिलेले आहेत. मात्र त्यावर अद्याप काही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच जरी नमुना नंबर ८ वरून वादी हा सदर वादग्रस्त घराचा मालक असल्याचे दिसून येत असले तरी त्याने अर्जात व्यक्त केल्या भितीप्रमाणे कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. सबब, अर्जात व्यक्त केलेली भिती ही निराधार असून केवळ त्रयस्थ व्यक्तींच्या तक्रार अर्जाव्दारे जैसे थे आदेश पारीत करणे उचित होणार नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

<u>आदेश</u>

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by VEDVATI ANIRUDHA ADYA
Date: 2024.10.09 17:21:03 +0530

दिनांक–०८/१०/२०२४

(वेदवती अ. आद्य)
सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जिंतूर.